**मे. मकरधोकडा खुली खाण (टप्पा-१) वेकोली उमरेड या कंपनीद्वारे उत्पादन क्षमता २.० मिलीयन टन प्रतीवर्ष ते ३.५ मिलीयन टन प्रतीवर्ष या उत्पादनासाठी प्रस्तावित प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचे इतिवृत्त दि. १६/०१/२०२०.**

मे.मकरधोकडा खुली खाण (टप्पा-१) वेकोली उमरेड, ता.उमरेड, जि.नागपूर येथे उत्पादन क्षमता २.० मिलीयन टन प्रतीवर्ष ते ३.५ मिलीयन टन प्रतीवर्ष या उत्पादनासाठी प्रस्तावित प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी दिनांक १६/०१/२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता कम्युनिटी हॉल, डब्ल्युसीएल कॉलोनी, उमरेड, ता.उमरेड, जि.नागपूर येथे श्री. रविंद्र खजांजी, अतिरक्ति जिल्हादंडाधिकारी, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. श्री. अशोक करे, प्रादेशिक अधिकारी, नागपूर हे म.प्र.नि.मंडळाचे प्रतिनिधी तथा लोक सुनावणी समितीचे सदस्य होते व श्री.आनंद काटोले, उप-प्रादेशिक अधिकारी, नागपूर-२ यांनी समन्वयक म्हणून काम केले. पर्यावरण विषयक लोक सुनावणीच्या वेळी उपस्थित असलेल्या लोकांच्या नावांची यादी सोबत जोडत आहोत. **(सहपत्र-१).**

**पार्श्वभूमी**

विद्यमान मकरधोकडा-१ विस्तार खुली खाण (२.० दशलक्ष टन प्रतीवर्ष) हा डब्ल्युसीएलचा चालु प्रकल्प आहे. जो उमरेड खुली खाणीच्या पश्चिमेला ३ किमी पश्चिम आणि नागपूर जिल्ह्यातील उमरेड शहराच्या उत्तर-पश्चिमेला १० किमी अंतरावर स्थित आहे. उमरेड टाउनशिप नागपूरच्या उत्तर पश्चिम ४५ किमी अंतरावर आहे. प्रकल्पाच्या उत्तर पश्चिमेस सर्वात जवळील चालू खाण संपली आहे. उमरेड बुटीबोरी रेल्वेमार्ग मकरधोकडा-१ खुली खाण आणि संपलेली मकरधोकडा-२ खुली खाण तसेच दिनेश (मकरधोकडा-३) खुली खाणीच्या दक्षिणेकडील सीमेवरून जाते.

पर्यावरण, वन आणि जलवायु परिवर्तन मंत्रालयाकडुन क्र. J-11015/54/2006-IA-II(M) dtd.26.11.2015 द्वारा ६६०.७० हेक्टर लीज क्षेत्रात मकरधोकडा-१ विस्तार खुली खाण १.० दशलक्ष टन प्रतीवर्ष ते २.० दशलक्ष टन प्रतीवर्ष वाढीसाठी पर्यावरण स्वीकृती दिली. पर्यावरण स्वीकृतीचा हा विस्तार EIA अधिसूचना २००६ च्या 7(ii) अंतर्गत मंजूर झाला. १.० दशलक्ष टन प्रतीवर्षाच्या प्रकल्पाला पूर्वी ईसीच्या पत्र क्र. J-11015/54/2005-IA.II(M) दिनांक 02.08.2006 द्वारा पर्यावरण स्वीकृती मिळाली होती.

अलीकडेच, डब्ल्युसीएलने खाणचे आयुष्य कमी झाले तरी उपलब्ध पायाभूत सुविधा व जमिनीत चालू असलेल्या खुली खाण प्रकल्पांचे जलद गतीने खनन करून खनन योग्य साठा जलद गतीने कमी करण्याचा निर्णय घेतला आहे. म्हणूनच, वाढीव ३.५ दशलक्ष टन क्षमतेसाठी मकरधोकडा-१ विस्तार खुली खाण योजना न्याय्य आहे आणि खाण, ऊर्जा क्षेत्रासाठी नानकोकिंग कोळशाची मागणी व पुरवठा यातील अंतर कमी करण्यास मदत करेल.

**प्रयोजन व कार्यपध्दती**

उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, नागपूर-२ यांनी उपस्थितांचे स्वागत करून अध्यक्षांच्या परवानगीने लोकसुनावणीच्या कार्यवाहीची सुरवात केली.

श्री. रविंद्र खजांजी, अतिरक्ति जिल्हादंडाधिकारी, नागपूर व अध्यक्ष जन लोकसुनावणी समिती, यांनी जाहिर लोकसुनावणी घेण्याबाबतचा उद्देश व त्याची कार्यपध्दती समजावून सांगितली. त्यानुसार या ठिकाणी प्रस्तावित उत्पादनाच्या परवानगी बाबतचा कोणताही निर्णय घेण्यात येणार नाही असे स्पष्ट केले. या जाहिर लोक सुनावणीमध्ये घेण्यात येणाऱ्या आक्षेपांची नोंद घेणे व शासनास पाठविणे एवढेच काम ही समिती करणार. त्यामुळे उपस्थित जनतेला या प्रकल्पाबाबत त्यांच्या सूचना, टिका, टिप्पणी, निवेदने व आक्षेप घ्यावयाचे असतील तर या ठिकाणी तोंडी किंवा लेखी स्वरूपात मांडावयाचे आहेत त्याची नोंद घेवून ते शासनास पाठविण्यात येईल असे सांगितले.

..२/-

उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, नागपूर-२ यांनी भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालयाच्या अधिसूचना क्र. **SO 60(E) dtd. 27th Jan. 1994** व सुधारणा दिनांक १४ सप्टेंबर, २००६ नुसार लोकसुनावणी घेण्याचे प्रयोजन विशद आहे. तसेच त्यामधील तरतुदीनुसार दिनांक ०७/१२/२०१९ ला दैनिक हितवाद (इंग्रजी) व दैनिक नवराष्ट्र (मराठी) या दोन मोठ्या प्रमाणात वितरीत होत असलेल्या स्थानिक वृत्तपत्रात या पर्यावरण विषयक लोकसुनावणीबद्दल जाहीर सूचना प्रसिध्द करण्यात आले आहे त्याबद्दल कळविले. दैनिक वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या सुचनांच्या वृत्तपत्र कात्रणाची प्रत सोबत जोडली आहे. **(सहपत्र-२).**

भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालयाच्या अधिसुचने प्रमाणे प्रकल्पाची ठळक वैशिष्ठे असलेल्या, पर्यावरण आघात मुल्यनिर्धारण अहवालाच्या संक्षिप्त विवरणाची प्रत व इतर माहिती असलेले कागदपत्रे (इंग्रजी व मराठी मध्ये) विविध सरकारी कार्यालयात तसेच ग्रामपंचयत कार्यालयात नागरीकांच्या अवलोकनार्थ ठेवण्यात आलेले होते. जाहिर सूचना प्रसिध्द झाल्यापासून जाहिर सुनावणीच्या तारखेपुर्वी परिसरातील लोकांकडून लिखीत स्वरूपात सूचना, टीका-टिप्पणी व आक्षेप मागविण्यात आलेले हाते. जाहीर लोकसुनावणीच्या दिवसापर्यंत १ निवेदने/आक्षेप म.प्र.नि.मंडळाकडे ईमेलद्वारा प्राप्त झाला. तदनुसार, मंडळाचा आदेश क्र. ई-९५/२०१९ पत्र क्र. BO/JD/(WPC)/PH/B-5144 dtd. 16-12-2019 नुसार लोक सुनावणी समिती गठीत करण्यात आली. या आदेशाची प्रत तसेच लोकसुनावणी पुर्वी / दरम्यान प्राप्त आक्षेप/निवेदन व समर्थनाच्या प्रती सोबत जोडत आहे. **(सहपत्र-३).**

तद्नंतर उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, नागपूर-२ तथा समन्वयक यांनी प्रकल्प धारकाला प्रकल्पाबद्दल व पर्यावरणीय अहवालाबाबत विस्तृत सादरीकरण करण्यास सांगितले. तदनुसार, प्रकल्प धारकाच्या प्रतिनिधीने तपशिलवार स्थानिक भाषेत उत्पादन क्षमता २.० मिलीयन टन प्रतीवर्ष ते ३.५ मिलीयन टन प्रतीवर्ष या उत्पादनासाठी प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक बाबींबाबत प्रकल्प परिसर, प्रस्तावित प्रकल्पाचे लाभ, प्रस्तावित सुविधा, अग्निशामक सुविधा, प्रक्रियेचे विवरण, वातावरणाची माहिती आणि अपेक्षित परिणामांची पडताळणी, जमिनीवरील घटक, वातावरण व हवामान, हवेतील घटक, परिसरातील हवेचा दर्जा, आपत्ती व्यवस्थापन योजना, हवा प्रदूषणाचे स्त्रोत, ध्वनी घटक, जल घटक, उपलब्ध पाण्याचा दर्जा, पाण्याचा वापर, सांडपाण्याची निर्मिती, जैविक घटक, सामाजिक आणि आर्थिक घटक, स्थानिक मूलभूत सोयीसुविधांवर होणार परिणाम, पर्यावरण व्यवस्थापन योजना, हवेतील उत्सर्जन, सांडपाणी व्यवस्थापन, वनीकरण कार्यक्रम, काळजी व्यवस्थापन आणि परिक्षण या बाबींवर सादरीकरण केले.

सादरीकरण झाल्यावर श्री.आ.नि.काटोले, उप-प्रादेशिक अधिकारी तथा समन्वयक यांनी उपस्थित नागरिकांना या प्रस्तावित प्रकल्पाबाबत आपले अभिप्राय, विचार, टिका, टिप्पणी व प्रश्न विचारण्याबाबत आव्हान केले. त्याप्रमाणे खालील नमुद लोकांनी आपले अभिप्राय, विचार, टिका, टिप्पणी व प्रश्न मांडले.

कार्यवृत्त :

१. **श्री.चंद्रमणी पिल्लेवान, शिरपूर**
   - जड वाहनांच्या वाहतुकीमुळे ध्वनी प्रदूषण होते, यामुळे लोकांच्या आरोग्यावर मानसिक व शारीरीक त्रास होतो. यावर वेकोलीने योग्य ती दखल घ्यावी. ध्वनी प्रदूषणाबाबत वेकोलीवर FIR दर्ज करावा.
   - शिरपूर या गावामध्ये पाण्याची समस्या आहे, लवकरात लवकर गावाचे पुनर्वसन करण्यात यावे. वाहतुकीमुळे शिरपूर या गावात धुळ येतो, याचा परिणाम गर्भवती महिलांवर होतो.

- शिरपूर गावांतील शेतकऱ्यांच्या शेतीमध्ये जनावरे व वन्यप्राणी हैदोस करून शेतपिकांचे नुकसान करतात, वेकोलीने शेतकऱ्यांना नुकसानभरपाई दयावी.

- वेकोली प्रशासनाने सन १९९८ मध्ये जमीन अधिग्रहण करून त्याचा मोबदला २००३ साली दिला. परंतु वेकोलिन २९ लोकांना नोकरी दिलेली नाही आणि रू. ६ ते ८ लक्ष प्रमाणे मोबदला मिळाला. याकरीता ३ ते ४ महिन्यात ग्रामपंचायत कार्यालयामध्ये सुनावणी घेवून शिरपूर गावांतील लोकांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी वेकोलीचे अधिकाऱ्यांच्या समवेत समस्यांचे निराकरण करण्यात यावे.

- शिरपूर गावाच्या समस्या खूप आहेत, शेतमजुर बेरोजगार झालेला आहे, त्यांच्या रोजगाराचा विचार करावा. वेकोलिने वेगळा रोजगार उपलब्ध करून दयावा. तसेच शिरपूर-कान्हवा या गावास पुनर्वसनाची आवश्यकता आहे.

- शिरपूर-कान्हवा गावांतील लोक वेकोलीच्या विरोधात बोलत आहेत.

२. **श्री.प्रमोद हाडके, शिरपूर**

- वेकोलीद्वारे कोळसा उत्खननामुळे शिरपूर गावांला धोका व त्रास आहे.

- वेकोलीने शिरपूर गावाच्या विहिरींलगत खोदकाम करून उत्पादन सुरू केले आहे. त्यामुळे विहिरीचे पाणी प्रदुषित झाले असून या प्रदूषित पाण्याचा पुरवठा होत आहे.

- ब्लास्टींगमधुन निघणारे रसायनयुक्त पदार्थामुळे हवा व जल प्रदूषण होत आहे. त्याचप्रमाणे ब्लास्टींगच्या मोठ्या क्षमतेमुळे लहान मुले व महिलांच्या आरोग्यावर परिणाम होतो व घरांना हादरे बसतात.

- वेकोलीने शिरपूर गावालगतची जमीन अधिग्रहीत करून वाहतुक व खोदकाम गावाजवळच सुरू केल्यामुळे हवा प्रदूषण होते. काही जमीनीचा भाग सुटला आहे, शेतीमध्ये पाण्याचा निचरा होत नाही, शेतकऱ्यांना शेतामध्ये जाण्यासाठी रस्ता नाही त्यामुळे शेती करता येत नाही. वेकोलीने संपुर्ण जमीन अधिग्रहीत करावी.

- वेकोलीने शिरपूर व गट ग्रामपंचायत कान्हवा गावाचे पुनर्वसन उमरेड शहरालगत करावे.

३. **श्री.डोमाजी श्रीखंडे, सरपंच, ग्रा.पं.मकरधोकडा.**

- मकरधोकडा, शिरपूर, हेवती व कटारा या गावांतील शेतकऱ्यांनी वेकोलीला कोळसा उत्पादनासाठी शेती बिनशर्त दिलेली आहे.

- वेकोलीने शेतकऱ्यांसाठी रस्ता दिलेला नाही त्यामुळे ४०० ते ५०० एकर जमीन पडीत आहे. उर्वरीत शेत जमीनींचा रस्ता बंद केलेला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना अडचण होते.

- वेकोलीच्या ब्लास्टींगमुळे घरांना हादरे, तडे बसतात व धुराचा त्रास होतो. तसेच शेतपिकांवर धुर बसतो, त्यामुळे शेतीचे उत्पादन कमी झाले आहे त्यामुळे उत्पन्नावर त्याचा परिणाम होत आहे. याबाबत वेकोलीने कुठलीही दखल घेतलेली नाही.

- वेकोलिने ६१४ हेक्टर जमीन घेतलेली आहे की घेणार आहे ते विशद करावे तसेच ही जमीने केंद्र शासनाच्या नियमानुसार घ्यावी.

४. **श्री.भिका भैय्याजी भोयर, उप-सरपंच, ग्रा.पं.हेवती.**

- वेकोलीच्या मकरधोकडा-३ ची पर्यावरण विषयक जनसुनावणी झाली, त्या सुनावणी दरम्यान वेकोलीने दिलेली आश्वासने पुर्ण केलेली नाही.

- मकरधोकडा-३ खाण ही २०१५ मध्ये सुरू झाली असून वेकोलीने कोणती उपाययोजना केली. या खाणीमध्ये खाजगी मजुर काम करतात त्यांना शौचालय बांधुन दिले नाही, त्यामुळे मल:निसारण परिसरात सोडले जाते व दुर्गंधीचा त्रास होतो.

- खाणीमुळे मकरधोकडा येथील शेतकऱ्यांच्या शेतजमीनीवर मोठ्या प्रमाणात धूर बसतो त्यामुळे उत्पादन क्षमता कमी होते. वेकोलीने नुकसान भरपाई दयावी. तसेच वाहतुकीमुळे मोठ्या प्रमाणात ध्वनी प्रदूषण होते त्याचा परिणाम नागरीकांच्या आरोग्यावर होत आहे.

- पुरेसा मोबदला मिळाला नाही. ब्लास्टींगमुळे घरांना हादरे बसतात.

- मकरधोकडा ग्रामपंचायतीकडुन ना-हरकत प्रमाणपत्र न घेता वेकोलीने काम सुरू केले आहे. याबाबत वेकोलीने शेतकऱ्यांना न्याय दयावा.

५. **श्रीमती विणा मांडवकर, उप-सरपंच, ग्रा.पं.शिरपूर.**

- कान्हवा हे गांव वेकोलीच्या लगत असुन वेकोलीने कान्हवा गावाची जमीन अधिग्रहित करावी. याबाबत महाप्रबंधक वेकोली यांनी सर्व्हेक्षण केले परंतु अद्यापपावेतो त्यावर कुठलाही तोडगा निघालेला नाही.

- ब्लास्टींगमुळे कान्हवा गावांतील घरांना तडे बसतात आणि विषारी धुराचा मानवी आरोग्यावर व शेतीचे नुकसान होते. वेकोलीने कान्हवा गावाचे पुनर्वसन करावे.

- नदी वळण प्रकल्प व सततधार पावसामुळे नदीला येणाऱ्या पुराचा परिणाम गावकरी व शेतकऱ्यांना त्रास होतो.

- कान्हवा गावांतील लहान मुले व वयोवृध्द लोकांना ब्लास्टींगमुळे त्रास होतो व घरांना भेगा पडतात. यावर वेकोलीला सूचना देवूनही कार्यवाही केलेली नाही. कान्हवा गांव दत्तक घ्यावे, लवकरात लवकर समस्यांचे निराकरण करावे, अन्यथा आंदोलन करण्यात येईल.

- वेकोलीच्या खाणीमध्ये संरक्षण भिंत नसल्यामुळे जनावरे शेतामध्ये येवून पिकांचे नुकसान होते त्यामुळे उत्पादन्नावर परिणाम होते आहे.

६. **श्री. अजय बुलकुंदे, कान्हवा.**

- वेकोलीमुळे दुषित पाणी, धूर व जलवायु प्रदूषण होते. वेकोलीला पर्यावरण विषयक परवाना कां देण्यात आला.

७. **श्री. राहुल हुलके, हेवती.**

- हेवती गावांतील लोकांना उपचारासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र, मकरधोकडा येथे जाण्यासाठी हेवती-मकरधोकडा रस्ता वेकोलीने बंद केला आहे.

- मागील ५ वर्षापासुन हेवती गावाचे पुनर्वसन प्रलंबीत आहे.

..५/-

- ब्लास्टींग व कोळशाच्या धुरामुळे आरोग्यावर विपरीत परिणाम होवुन अस्थमाचे आजार होतात. यावर वेकोलीने कुठलीही दखल घेतलेली नाही.

- भाईजी पेट्रोल पंम्पापासुन कोळशाचे ट्रक उभे राहत असल्यामुळे नागरीकांना रहदारीचा व हवा प्रदूषणाचा त्रास होतो.

८. **श्री. विठ्ठल रामकृष्ण उईके, माजी सभापती, पं.स.उमरेड**

- या जनसुनावणीमध्ये या क्षेत्राचे नवनिर्वाचित आमदार यांना आमंत्रीत कां केले नाही?

- वेकोलीने शेतकरी व शेतमजुरांवर अन्याय केलेला आहे.

- हेवती गावांस दूषित पाण्याचा पुरवठा होवून ते पाणी नागरीकांना प्यावे लागत असल्यामुळे आरोग्याच्या समस्या निर्माण होतात. याकरीता पिण्याच्या पाण्यासाठी जलशुध्दीकरण यंत्र (आरओ प्लान्ट) बसविण्याकरीता वेकोलीला पत्राद्वारे सूचना दिल्या व वेकोली प्रशासनासोबत चर्चा करूनही न्याय मिळालेला नाही.

- वेकोलीने आमदारांच्या सहकार्याने शेतकऱ्यांच्या जमिनी घेवून शेतकऱ्यांना चारपट पैसे देण्याचे आश्वासन दिले. परंतु आजतागायत शेतकऱ्यांना मोबदला मिळालेला नाही. या परिसरातील शेतजमीनीकरीता आंदोलने व वेकोलीच्या कामकाजावर बहिष्कार तसेच कोणतेही काम होवू देणार नाही असे सांगतिले. तसेच शेतकऱ्यांवर अन्यास झाल्यास उमरेड व भिवापूर तालुक्यातील वेकोलीच्या खाणी ठप्प केल्या जातील.

९. **श्री. सुरेन्द्र भेंडे, कान्हवा**

- वेकोलीने पडीत जमिनीवर वृक्षारोपन करावे, जेणेकरून बेरोजगारांना रोजगार मिळेल व वायु प्रदूषणांवर नियंत्रण मिळविता येईल.

१०. **श्री. सुनंदा रेड्डी, पर्यावरण तज्ञ.**

- यांनी प्रकल्पास पाठींबा दर्शविला.

११. **श्री. सुनिल डहारे, कान्हवा.**

- वेकोलीचे प्रदूषणा खुप मोठ्या प्रमाणात आहे माझे शेत रेल्वे लाईन जवळ असून प्रदूषणामुळे शेतपिकाचे उत्पादन कमी होत आहे. कापुस काळा होत असल्यामुळे योग्य भाव मिळत नाही. प्रदूषणामुळे मजुर काम करण्यास भेटत नाही.

- नागरीकांना न विचारता वेकोलीने रस्ता तयार केला असून ३ कि.मी. रस्ता खराब आहे. त्यामुळे गावकऱ्यांना १५ किमी अंतराच्या वेगळ्या मार्गाने फेरा घालुन जावे लागते.

- वन्यजीव व जनावरे झाडांमध्ये लपुन असतात त्यामुळे शेतपिकांचे नुकसान होते.

१२. **श्री. घनश्याम हाडके, सदस्य, ग्रा.पं. सायकी.**

- कोळसा खाणीच्या धुळीमुळे शेतपिकांवर व पाण्यावर धुळ बसत असल्यामुळे लोकांना अस्थमाचे विकार वाढत चालला आहे. ब्लास्टिंगमुळे गावात घरातले भांडे पडतात, भिंतीना भेगा पडत आहेत, प्रदूषणामुळे शेतीचे उत्पन्न कमी होत आहे.

१३. **श्री. डॉ.पी.एम. शंभरकर, हेवती.**

- मागील तीन वर्षापासुन वेकोलिद्वारे सांगत आहे की, हेवती गावाचे पुनर्वसन होणार आहे, परंतु आजपर्यंत पुनर्वसन कां झाले नाही?
- वेकोलिने अधिग्रहित केलेल्या जमिनीचा मोबदला आजच्या बाजारभावाप्रमाणे मिळाला पाहीजे. उदासा ते बायपास रोडपर्यंत सतत कोळशाचे ट्रक्स उभे असतात, त्यामुळे दुर्घटना होण्याची शक्यता आहे. त्याबाबत वेकोलिने वाहनतळ निर्माण करणे आवश्यक आहे व पोलिस विभागाला रहदारी नियंत्रणाकरीता वेकोलितर्फे आवश्यक ती उपाययोजना करावी.
- ब्लास्टींगमुळे कान्हवा गावांतील घरांना तडे बसतात आणि विषारी धुराचा मानवी आरोग्यावर व शेतीचे नुकसान होते त्यावर योग्य नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. वेकोलीने हेवती गावाचे पुनर्वसन करावे.

१४.**श्री. आशिष डाहाके, वेकोलि कर्मचारी.**

- उमरेड येथील वेकोलीच्या रूग्णालयात उपचाराकरीता योग्य ती दखल न घेतल्यामुळे रूग्णाला पुढील उपचाराकरीता योग्य उपचार मिळत नाही.

१५.**श्री. नितीन बोबडे, शिरपूर.**

- शिरपूर गावांतील ७० ते ८० लोकांची जमीन अधिग्रहीत करण्यात आली असून अद्यापपावेतो त्यांना नोकरी मिळालेली नाही. तसेच शेती गेल्यामुळे त्यांचा रोजगार देखील हिरावलेला आहे.
- वेकोलि प्रशासन बाहेरच्या व्यक्तींना रोजगार उपलब्ध करून देतात, स्थानिकांनाच रोजगार मिळावे.

१६.**श्री. विजय घोडे, मकरधोकडा.**

- दिनेश खुली खाणीजवळ खसरा क्र. ७१/१, ७१/३ व ५९/१ मध्ये २० ते २२ एकर शेतजमीन असून सदर शेतजमिनीच्या भोवताल खदानीमधुन निघणारी माती, ब्लास्टींगमुळे उडणारी डस्ट व खदानीचे पाणी शेतामध्ये येत असल्यामुळे शेती करणे कठीण झाले आहे. तसेच उत्पन्नात घट होत आहे त्यामुळे सदर शेतीचे अधिग्रहन करून योग्य तो मोबदला दयावा.

१७.**श्री. राजु वाटाणे, ग्रा.पं.हेवती.**

- हेवती गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही, वेकोलिने पर्यायी व्यवस्था महणुन कुपनलिका उभारावी. गावामध्ये जाण्यासाठी रस्ता नाही, नवीन कायदयाप्रमाणे मोबदला मिळावा.

१८. **श्रीमती सुशिला जाधव, सदस्य ग्रा.प.मकरधोकडा**

- वेकोलिने जमिन अधिग्रहन करून नोकरीची आवश्यकता असतांनाही अद्यापपावेतो मुलाला व मुलीला मागील ५ वर्षापासुन नोकरी दिली नाही यासाठी वेकोली प्रशासनानही न्याय देत नाही.

१९.**श्रीमती मंदा भुसारी, माजी सरपंच, ग्रा.प.शिरपूर**

- वेकोलिने जमिनीचे अधिग्रहन ना-हरकत प्रमाणपत्र न घेता केली. परंतु अद्यापपावेतो मोबदला मिळालेला नाही.
- जमीनी भोवताल माती टाकल्यामुळे जमीनी बुजल्या गेल्या. नोकरी देखील मिळालेली नाही. याबाबत वेकोलि प्रशासनाकडुन योग्य न्याय मिळालेला नाही. त्यामुळे आम्हांला न्यायालयात दाद मागावी लागली व प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
- ब्लास्टींगमुळे गावांतील घरांना तडे बसतात आणि विषारी धुराचा मानवी आरोग्यावर परिणाम होत आहे. तसेच आरोग्या सुविधा उपलब्ध नाही.

..७/-

**२०. श्रीमती योगीता मानकर, सरपंच, ग्रा.पं.वायगांव**

- धुळीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात असल्यामुळे त्यावर पाणी मोठ्या प्रमाणात शिंपडण्यात येते त्यामुळे चिखल होतो व या चिखलावरून लोक वाहन चालवितांना घसरून पडतात. व्यवस्थापनाने वाहनतळाची निर्मिती करावी.

- वेकोलीने सिएसआर फंडामधुन पिण्याच्या पाण्यासाठी आरओ प्लान्ट उभारण्यात यावे तसेच वृक्षारोपन करावे.

**२१.श्री.सुबोध हाडके,शिरपूर**

- शिरपूर-कान्हवा गावांतील ९५ टक्के जमीन अधिग्रहीत केलेली असल्यामुळे या परिसरातील शेतमजुर बेरोजगार झालेला आहे. या शेतमजुरांना वेकोली व्यवस्थापनाने रोजगार उपलब्ध करून दयावा.

- ज्या सुविधा वेकोलिच्या कर्मचाऱ्यांना मिळतात त्या सर्व सुविधा खाजगी कामगारांना मिळत नाही. त्याकरीता व्यवस्थापनाने योग्य निर्णय घेवून त्या सर्व सुविधा उपलब्ध करून दयाव्या.

- वेकोलि व्यवस्थापनाने कामगारांना सन्मानजनक वागणुक देवून सर्व सुविधा उपलब्ध करून दयाव्या.

**२२. श्री. आशिष काशिमकर, हेवती**

- हेवती गावाच्या पुनर्वसनाचे संथगतीने होत आहे. व्यवस्थापनाने दिलेल्या आवश्वासनांची पुर्तता अद्यापपावेतो केलेली नाही, ती केव्हा करणार?

- वेकोलीला लागुन असलेली शेती करता येत नाही. त्यामुळे बेरोजगारीची समस्या निर्माण झालेली आहे, शेतीकडे दुर्लक्ष होत आहे, आरोग्याच्या समस्या वाढल्या आहेत तसेच ब्लास्टींगमुळे मोठ्या प्रमाणात धोका निर्माण झालेला आहे.

**२३. श्री.रोशन पाटील, पत्रकार, देशोन्नती**

- वेकोलीचे मोठ्या प्रमाणात उत्खनन होते त्यामुळे जनतेच्या आरोग्यावर मोठ्या प्रमाणात परिणाम होत आहे.

- कोळशाचे ट्रक वाहतुक व चौपदरीकरणामुळे अपघात होतात यावर वेकोली प्रशासनासोबत वारंवार चर्चा करूनही वाहनतळाची निर्मिती केलेली नाही. याबाबत पोलिस विभागास तक्रार केल्यास समस्याचे निराकरण होत नाही व वेकोली व्यवस्थापन पोलिस विभागास मदत करीत नाही.

- शिरपूर गावांचे अनेक प्रश्न प्रलंबित असून न्याय मिळत नाही.

**२४. श्री.उपासराव पाल, हेवती.**

- वेकोलीचे खूप मोठ्या धुळीकरणामुळे सर्दी व खोकला या आजाराला सामोरे जावे लागते. बेरोजगारीची समस्या मोठ्या प्रमाणात आहे, रोजगार नाही, हेवती गावांतील लोकांना न्याय देण्यात यावा.

**२५. श्री. ताराचंद मगे, मकरधोकडा**

- वेकोलीने २५ किमी अंतरावरील शेती अधिग्रहीत केलेली नाही. मोबदला मिळालेला नाही. शेतकरी शेती दयायला तयार आहेत. आरोग्याबाबत न्याय मिळत नाही तसेच मागील ५ वर्षापासुन नोकरी मिळालेली नाही, नोकरी ही माझ्या पत्नीला देण्यात यावी.

**प्रकल्प प्रस्तावक : प्रकल्प प्रवर्तकाने उपस्थित नागरीकांनी मांडलेल्या सुचनांबद्दल अभिनंदन केले व त्यांच्या सुचनांचे तसेच प्रश्नांचे उत्तर त्यांच्या विभागामप्रमाणे संबंधित अधिकाऱ्यांनी खालीलप्रमाणे सांगितले.**

**श्री. ए.पी.नवले, वरिष्ठ प्रबंधक, वेकोली :-**

- शिरपूर गावाच्या पुनर्वसनाचे कार्य प्रगती पथावर आहे. तसेच पिण्याच्या पाण्याची समस्या लवकरच सोडविण्यात येईल असे आश्वासन दिले. ग्रामपंचायतद्वारे प्रस्ताव प्राप्त झालेला असुन त्या अनुषंगाने पिण्याच्या पाण्यासाठी विहिर बांधण्याकरीता अंदाजपत्रक तयार केले जाईल.

- शिरपूर ग्रामपंचायत हद्दीतील २.५० हेक्टर जमिन अधिग्रहीत करण्याकरीता प्रस्ताव मंत्रालयामध्ये सादर करण्यात आला होता. परंतु सदर प्रस्तावामध्ये शिरपूर ग्रामपंचायतीचे ना-हरकत प्रमाणपत्र नसल्यामुळे मंत्रालयातुन प्रस्ताव वेकोली प्रशासनास परत करण्यात आला. शिरपूर ग्रामपंचायतीने ठराव पारित करून ना-हरकत प्रमाणपत्र दिल्यास सदर प्रस्तावावर आवश्यक कार्यवाही करण्याकरीता वेकोलि व्यवस्थापनाकडे पाठविला जाण्याबाबतचे आश्वासन दिले.

- उमरेड क्षेत्रीय दवाखान्यामध्ये गावकऱ्यांना दोन वर्षापासुन सुविधा देण्यात येत आहे. सदर दवाखान्यामध्ये ३५०० बाह्यरुग्णांनी वैद्यकीय सेवेचा लाभ घेतलेला आहे. गावांमध्ये आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात येते व तेथे वैद्यकीय उपचार दिले जातात. प्रत्येक महिन्यात वैद्यकीय शिबिराचे आयोजन करण्याच्या मागणीचे स्वागत करून त्याबाबतचे आश्वासन दिले.

- धुळीच्या नियंत्रणाकरीता कच्च्या रस्त्याचे रुपांतर पक्का रस्ता (टार रोड), पाण्याची फवारणी व रस्त्यांची नियमित साफसफाई करण्याबाबतचे आश्वासन दिले.

**श्री. संदिप परांजपे, विभाग प्रमुख (जमिन व महसुल) वेकोली :-**

- मकरधोकडा-१ खुली खाण टप्पा-१ करीता ६१४ हेक्टर जमीन अधिग्रहित केलेली आहे. त्यापैकी ५९० हेक्टर जमिन वेकोलि प्रशासनाच्या ताब्यात असुन उर्वरीत सरकारी जमिन ताब्यात घेण्याची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

- शिरपूर व कान्हवा या गावांतील ४५ हेक्टर जमिन जमिनधारकासोबत चर्चा करून अधिग्रहीत करण्यात येईल व या गावाचे पुनर्वसन लवकरच केले जाईल. तसेच नवीन कायदयानुसार पुनर्वसन करण्यात येईल.

- कान्हवा गांव प्रत्यक्षपणे बाधीत होत नाही. परंतु लोकांच्या आग्रहास्तव त्याबाबत पुन:श्च होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करून त्याचा अंतर्भाव पर्यावरणीय आघात मुल्यांकन अहवालामध्ये केल्या जाईल.

- मकरधोकडा-१ च्या जमिन अधिग्रहना दरम्यान २००३ च्या कायदेशिर प्रक्रियेनुसार मोबदला देण्यात आला होता. त्यापैकी १९ लोकांनी मोबदला घेतलेला नव्हता. नविन शासन निर्णयानुसार २०१६ च्या जमिन अधिग्रहन कायदयान्वये १९ लोकांना मोबदला देण्यात आला.

- दिनेश खुली खदान करीता १५०० हेक्टर इतकी जमिन अधिग्रहीत करण्यात आली व त्यांना ऑगस्ट, २०१२ शासन निर्णया प्रमाणे मोबदला देण्यात आला तसेच आर ॲन्ड आर पॉलिसी अन्वने नोकरी देण्यात आली.

- दिनेश खुली खदान या प्रकल्पामध्ये आर ॲन्ड आर पॉलिसी प्रमाणे हेवती गावांतील १४९ लोकांना तसेच याच प्रकल्पामध्ये १२३४ नवीन नोकऱ्या निर्माण करून ८७० स्थानिकांना नोकऱ्या देण्यात आल्या.

- श्री.पजई यांना रोजगार प्रदान केला गेला होता. परंतु वैद्यकीय चाचणीमध्ये त्यांना अपात्र ठरविण्यात आले. त्यामुळे त्यांनी त्यांच्या पत्नीला अथवा अन्य लिनीयर डिपेन्डंट नामनिर्देशीत केल्यास त्यावर पुढील कार्यवाही करता येईल.

- हेवती गावाच्या पुनर्वसनाकरीता सन २०१७ मध्ये उदासा गावाजवळ जमिन घेण्यात आलेली आहे व त्यास सर्व मान्यता प्राप्त झालेल्या आहे. जमिनीचे सपाटीकरण, सुरक्षा भिंत इ. कामे झालेली आहेत व लवकरच पुनर्वसन करण्याचे आश्वासन दिले.

- नोकरीबाबत ज्या नागरीकांच्या समस्या असतील त्यांनी क्षेत्रिय कार्यालयामध्ये आपली कागदपत्रे सोबत आणुन प्रत्यक्ष चर्चा करावी. त्याबाबत वेकोलि प्रशासन योग्य ती कार्यवाही करेल.

- प्रत्येक महिन्यात आर ॲन्ड आर पॉलिसीबाबत बैठक घेण्याबाबत आश्वस्त केले.

**श्री. शेळके, वरिष्ठ प्रबंधक (जमिन व महसुल) वेकोली :-**

- ब्लास्टिंग करतांना डिजीएमएस या संस्थेने घालून दिलेल्या नियमांचे पालन केले जाते.

- दिनेश खुली खदानीच्या सभोवताल वृक्षारोपन करण्यात आलेले आहे आणि तिथे अजुन मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करण्यात येईल.

**महाप्रबंधक, उमरेड क्षेत्र, वेकोली :-**

- वेकोलितर्फे मोठ्या प्रमाणात काम करण्यात आलेले आहे. परंतु ते जरी समाधानकारक नसले तरी आम्ही त्याबाबत योग्य ती उपाययोजना करून कार्यवाही करण्यात येईल.

- या भागातील पर्यावरणीय स्थिती नियंत्रणात ठेवणे ही सततची प्रक्रिया आहे आणि त्याबाबत ती आम्ही चांगली ठेवण्याचा प्रयत्न करू.

- या जाहिर सुनावणीमध्ये उपस्थित झालेल्या मुद्दयांबाबत संबंधितांशी चर्चा करू व त्यांच्या सहकार्याने त्या सोडविण्याचा प्रयत्न राहील.

**श्री.राजु पारवे, आमदार, उमरेड क्षेत्र:-**

- लोकप्रतिनिधी या नात्याने या जाहिर सुनावणीचे निमंत्रण न दिल्याबद्दल नाराजी व्यक्त केली.

- या भागातील लोकांचे प्रश्न व समस्या याबाबत मला माहिती असून त्या समस्यांचे निराकरण लवकरात लवकर झाले पाहिजे त्याकरीता १५ दिवसामध्ये बैठक आयोजीत करून समस्यांचे निराकरण करावे असे सांगितले.

- खदानीमुळे परिसरातील शेतकऱ्यांना धुळीचा त्रास होत आहे त्याबाबत त्यांना नुकसान भरपाई त्वरीत मिळाली पाहिजे.

- सदर खाणीमध्ये वेकोलि प्रशासनांनी स्थानिक लोकांनाच रोजगार उपलब्ध करून दयावा. या परिसरात स्थानिक लोक कुशल व अकुशल आहेत.

- या भागातील स्थानिकांच्या व शेतकऱ्यांच्या समस्या वेकोलि प्रशासनांनी त्यांच्या कार्यालयात बैठक आयोजीत करून त्या समस्यांचे त्वरीत निराकरण करावे. तसेच हेवती, शिरपूर, कान्हवा येथील गावांच्या समस्यांचे निराकरण त्वरीत करावे.

- वेकोलि प्रशासनातर्फे पिराया गावाचे पुनर्वसन व्हायला पाहिजे.

लोकसुनावणी समितीचे अध्यक्ष, श्री. रविंद्र खजांजी यांनी कळविले की या समितीस एकुण ५ लेखी निवेदने प्राप्त झाली आहेत. लोकसुनावणीची कार्यवाही पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसुचनेनुसार करण्यात आली असून लोकसुनावणीबाबत ३० दिवस अगोदर वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे. नागरीकांनी उपस्थित केलेल्या आक्षेप/सूचना याबाबत सर्व नोंद घेवून त्या सूचनांचे/आक्षेपांचे निवारण करण्याकरीता प्रकल्पधारकास सूचना दिल्या.प्रदूषणाविषयी तक्रार असल्यास नागरीकांना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कार्यालयात निवेदने देण्यासंबंधी सुचित केले. तसेच सदर प्रकल्पाबाबत उपस्थित नागरिकांच्या प्रश्नांची व प्रकल्प प्रस्तावकांच्या उत्तराची उजळणी केली व उपस्थित जन समुदायाने शांतपणे आपले निवेदने मांडली व योग्य ते मुद्दे उपस्थित केले व त्यांची नोंद घेण्यात आल्याबाबत कळविले. पर्यावरण विषयक समितीचे अध्यक्ष, श्री. रविंद्र खजांजी यांनी सुनावणीचे सर्व समावेशक इतिवृत्त पर्यावरण विभागात पाठविले जाणार याबाबत उपस्थित नागरिकांना कळविले. पर्यावरण विषयक लोकसुनावणीचे समन्वयक श्री. आनंद काटोले यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले. तसेच माननीय अध्यक्ष्यांच्या परवानगीने ही जाहिर लोकसुनावणी संपली असे जाहिर करण्यात आले.

| | | |
|---|---|---|
| **(आनंद काटोले)**<br>**उप-प्रादेशिक अधिकारी-२,**<br>**म.प्र.नि.मंडळ, नागपूर व**<br>**समन्वयक, लोक सुनावणी समिती** | **(अशोक करे)**<br>**प्रादेशिक अधिकारी,**<br>**म.प्र.नि.मंडळ, नागपूर व**<br>**सदस्य, लोक सुनावणी समिती** | **(रविंद्र खजांजी)**<br>**अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, नागपूर व**<br>**अध्यक्ष, लोक सुनावणी समिती** |